स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

आंतरविद्याशाखांतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D.)

पदवीसाठीच्या प्रबंधाचा संशोधन आराखडा

-: विषय :-

"माध्यमिक स्तरावर शिक्षण घे□ाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास"

-: संशोधज :-

जवळेकर रूपाली वसंतराव

मु. पोस्ट कुरुंदा ता. वसमतनगर

जिल्हा हिंगोली.

-: मार्जदर्शज :-

प्रा. डॉ. ओ. एम. जीरसाजर

एस.आर.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन,

कंधार जि. नांदेड.

अनुक्रमाणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१.	प्रस्तावना	२
२.	संशोध□ समस्या शीर्ष□	४
३.	□ार्यात्मक व्याख्या	४
४.	संशोधनाची उद्दिष्टे	६
५.	संशोधनाची गृहितके	६
६.	संशोध□ परि□ल्प□ा	७
७.	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	७
८.	संशोधन पद्धती	८
९.	संशोधनाची साधने	८
१०.	संदर्भसूची	९

"माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास"

१) प्रस्तावनाः

संस्कृती ते लोकशाही व ज्ञान-कौशल्य, संस्कारमूल्य या सर्व बाजूंबरोबर मानवातील अनुकूल बदल म्हणजे शिक्षण. शिक्षणाद्वारे ज्ञान, चरित्र व संस्कृतीचे योग्य संवर्धन होत असते. मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास शिक्षणावर अवलंबून असतो. जेवढे व्यक्तीचे शिक्षण उच्च्, तेवढे तो यशाचे अत्यूच्च शिखर गाठतो. देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनवण्यात शिक्षणाची भूमिका अतिशय महत्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाचा पाया शाळेत रचला जातो. तुमच्या जवळ जे सर्वोत्तम आहे, ते प्रगट करणे म्हणजे शिक्षण. शिक्षण हे व्यक्तीविचार परिवर्तनाचे साधन, समाजप्रबोधनाचे माध्यम आणि ज्ञानाचे महाद्वार आहे. शिक्षणाने विचार प्रगल्भ होतात आणि त्यातून नवनिर्मिती घडत जाते.

'मुलीला शिकू द्या, वाढू द्या, जगू द्या'

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींचे शिक्षण व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेंकावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

'मुलगी शिकली, प्रगती झाली', हे बोधवाक्य आपण नेहमी ऐकतो. मुलीच्या शिक्षणाने समाज सुधारतो. एक शिकलेली मुलगी मोठेपणी सबंध कुटूंब सुशिक्षित करते. स्त्री कुटूंबाचा आस असते. संपूर्ण कुटूंब तिच्याभोवती फिरते. शिक्षणच स्त्री उद्धाराचे व समाज परिवर्तनाचे साधन आहे. म्हणून मुलांना शिक्षण देण्याबरोबरच त्यांचा शारीरिक विकास योग्यरित्या होणे फार गरजेचे आहे.

एक आई जसा आपल्या मुलांचा अभ्यास घेते, तसा कोणत्याही शिकवणी वर्गात घेतल्या जाऊ शकत नाही, कारण सुशिक्षीत आई अभ्यासाबरोबरच चांगल वागणं, प्रेम, सच्चेपणा, प्रामाणिकपणा आणि संस्कार देते, घडवते, पुस्तकी ज्ञानाबरोबरच समाजात वावरण्याचे धडे तिच्याकडूनच मिळतात. सर्व दृष्टिकोनातून सशक्त पिढी ती तयार करते. शिक्षणामुळे स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळते जे इतर अनेक स्वातंत्र्याशी निगडीत असते. म्हजु-ाच तिचा शारिरीक विकास आणि शिक्षण यांच्या एकत्रित परिणामांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणूनच,

"माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास" यावर संशोधनाची नितांत गरज वाटते.

समाजाचा एक घटक म्हणून, लोकशाहीचा आधार, व्यक्मित्वाचा परिपूर्ण विकास आणि विविध भूमिका बजावण्यासाठी मुलीचे शिक्षण ही काळाची गरज आहे. याचा उत्कृष्ट प्रयत्न म्हणजे इ.स. १८४८ मध्ये पुण्यातील भिडेवाड्यात मुलींसाठी पहिली शाळा थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुलेंनी काढली. त्यांच्यासोबत शाळेत अध्यापनाचे कार्य त्यांच्या सुविद्य पत्नी सावित्रीबाई फुलेंनी केले. शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात त्यांनी शिक्षणाचे महत्व सांगितले आहे. फुले दांपत्याने पालकांच्या भेटी घेऊन त्यांचे मत मुलींच्या शिक्षणास अनुकूल बनवले. त्यांनी मुलीं-ाा शिक्षणातून खरे-खोटे निवडण्याची क्षमता आली पाहिजे, यासाठी कसोशीने प्रयत्न केले.

शिक्षणामूळे स्त्रिया स्वावलंबी होतील याची जाणीव असणारे दूसरे महान व्यक्तिमत्व म्हणजे राजर्षी शाहू महाराज. पालज मुला-मुलींच्या एकत्र शाळेत मुलीं-ाा पाठवत नाहीत म्हणुन मुलींसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. हुशार मुलीं-ाा शिष्यवृत्ती

दिली. कॉलेजमध्ये मुलींना उच्च शिक्षण मोफत केले. प्रौढ व मागासलेल्या स्त्रियांना शिजणासाठी निवास व भोजनाची व्यवस्था मोफत केली.

राष्ट्रपिता महात्मा गांधींनी स्त्रीशिक्षणावर भर दिला तर स्वामी विवेकानंदानी उत्कृष्ट शिक्षणाच्या निकषांमध्ये स्त्रीशिक्षणास स्थान दिले. पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञ प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनीही स्त्रीशिक्षणास प्राधान्य दिले.

भारत सरकार तसेच महाराष्ट्र सरकारही मुलींच्या शिक्षणाचा प्राधान्यक्रम लक्षात घेता विविध लाभाच्या योजना राबवते. आणखी एक प्रयत्न म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे यांची हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था.

सामाजिक स्वातंत्र्याचा एक भाग, सामाजिक समानता, जीवनाचा एक भाग, कुटूंबव्यवस्था आणि भारतीय संस्कृती टिकवण्यासाठी मुलींचे शिक्षण, सोबत त्यांचा शारीरिक विकास अभ्यासणे गरजेचे आहे. म्हणूनच मला वाटते, या संशोधनाची गरज आहे.

२) संशोध□ समस्या शीर्षज :

"माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास"

३) ज ार्यात्मक व्याज्या:

अ) शिक्षण:

उपजत आंतरिक शक्तींचा विकास करून चांगला माणूस घडविण्याचे साधन म्हणजे शिक्षण अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणे मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक एक मूलभूत गरज, मूलभूत हक्क म्हणजे शिक्षण.

ब) मुली (व्याज्या):

मुली म्हणजे आनंद, ज्योती, फुलणांर रोप, घरात भरुन उरणारा सुगंध, वंशाची पणती, विश्वाच्या साखळीची कडी, समृद्धीचे अंगण, देशाची संपत्ती आणि राष्ट्राचे भविष्य.

ज) मुलींचे शिक्षणः

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी'

स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिज ीज रज करण्याच्या हेतूने राज्यातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, स्त्रीशिक्षणाचे प्रमाण वाढणे व कोणतीही मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणुन राबविण्यात आलेली एक संकल्पना म्हणजे मुलींचे शिक्षण.

ड) विज ासः

व्यक्तीमध्ये निश्चित दिशेने क्रमशः सुसंगतपणे, सुक्ष्मपणे व सातत्याने घडुन येणारा गुणात्मक स्वरूपाचा बदल म्हणजे विकास होय.

इ) शारीरिज विज ासः

विकासाच्या प्रक्रियेतील महत्वाची प्रक्रिया ज्यामध्ये ठराविक टप्प्यावर शरीरांतर्गत विविध बदल होतात. त्या बदलांचा परिणाम शरीर व मन यांच्यावर होऊन शारीरिज विज ास साधला जातो.

ई) ज्ञामीजः

ज्या गावातील व्यवस्थापन हे ज्ञामपंचायतीद्वारे चालते, त्यास ग्रामीण म्हणतात.

उ) शहरीः

ज्या गावातील कारभार नगरपालिका / महानगरपालिकाद्वारे चालतो, त्यास शहरी भाग असे म्हणतात.

ऊ) वसमत तालुकाः

महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोड १९६६ प्रमाणे वसमत तालुका हिंगोली जिल्ह्यात असून तालूक्यामध्ये जनगणना २०११ प्रमाणे १४५ खेडी आणि १२० पंचायती आहेत.

ए) इयत्ताः

जुण, काल, दर्जा या प्रमाणांचे मापन करण्यासाठी ठराविक, नेमून दिलेली मर्यादा म्हणजे इयत्ता.

४) संशोधनाची उद्दिष्ट्येः

१. माध्यमिक स्तरावर मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिज विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

२. शारीरिज विज ासामुळे वर्तनात व शिक्षणात पडणारा फरक अभ्यासणे.

३. शिक्षणातून शारीरिक विकास साधता येतो हे अभ्यासणे.

४. शारीरिक विकासाचा शिक्षणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

५. मुलींच्या शिक्षजाची गरज प्रतिपादित करणे.

६. मुलींच्या शारीरिक विकासाची प्रक्रिया समजून घेणे.

७. शारीरिक विकासामूळे शिक्षणात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास व त्यावर उपाय शोधजे.

८. शिक्षणामूळे शारीरिक विकासात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास व त्यासाठी काय ज रता येईल याचा विचार करणे.

५) संशोधनाची गृहीतकेः

१. माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेंकावर परिणाम होतो.

२. शिक्षण व शारीरिक विकास यांचा दृढ संबंध आहे.

३. शिक्षणातून शारीरिक विकास साधता येतो.

४. शारीरिज विज ासामूळे शिजजावर परिणाम होतो.

५. माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी शिक्षणातून प्रयत्न होत असतात.

६. शिक्षण व शारीरिक विकास या दोन बाबी परस्परपूरक आहेत.

७. योग्य व उचित शिक्षणातून संतुलित शारीरिक विकास साधता येतो.

६) संशोध परिज ल्प ाः

माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या शिज जाऱ्या मुलींचे शिक्षण व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर परिणाम होतो.

शू य परिज ल्प ाः

माध्यमिक स्तरावर शिज जाऱ्या मुलींचे शिक्षण व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामात सार्थज तापूर्ण फरज -ााही.

७) संशोधनाची व्याप्ती व मर्यादाः

प्रस्तूत संशोधनात वसमत तालुक्यातील माध्यमिक स्तरावर शिकणाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला आहे.

आशय व्याप्ती

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावर शिज जाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला आहे.

घटक व्याप्तीः

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींपुरतेच मर्यादीत आहे.

जेत्र मर्यादाः

प्रस्तुत संशोधनात वसमत तालुक्यातील माध्यमिक स्तरावर शिज्‍ जाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा समावेश केला आहे. त्या पुरतेच मर्यादीत आहे.

आशय मर्यादाः

प्रस्तुत संशोधन फक्त माध्यमिक स्तरावर मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शिक्षणाचा व त्यांाच्या शारीरिक विकासाचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास ज्‍ रण्यात आला आहे.

घटक मर्यादाः

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावर शिज्‍ जाऱ्या मुलींपुरताच मर्यादित विचार करण्यात आला आहे.

८) संशोधन पद्धतीः

या संशोधन पद्धतीत प्रामुख्याने शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला जाणार असल्यामुळे सर्वेक्षण पद्धती ही संशोधन पद्धती निवडलेली आहे.

सर्वेक्षणाच्या पायऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

१. समस्येची निवड

२. उद्दिष्टे

३. परिज्‍ ल्प-ना

४. संशोधन पद्धती

५. शैजजिज्‍ साध-ने

६. माहितीचे संकलन

७. विश्लेषज

प्रस्तुत संशोधन वस्तुनिष्ठ व वास्तव परिस्थितीचे असल्यामुळे सर्वेक्षण पद्धती अंतर्गत या संशोधन प्रकाराची निवड केली आहे.

९) संशोधनाची साधने:

१. माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींज रिता प्रश्नावली.

२. शिजज , पालज यांच्याकरीता प्रश्नावली.

३. तज्ञ व्यक्तींच्या मुलाखती.

१०) संदर्भसूची:

१. शिजजशास्त्र- विद्या प्रकाशन, नागपूर, २०१० डॉ. प्रमोद जोशी, प्रा. व्यंकट कदम, प्रा. अंगद जाधव.

२. शिजजशास्त्र- के. सागर पब्लीकेशन्स, २०१६, शशीकांत अन्नदाते.

३. Research in education - E.R.I.C. (U.S.) 1971

संशोधज

जवळेकर आर. व्ही.

मार्जदर्शज

प्रा. डॉ. ओ. एम. क्षीरसाजर

एस.आर.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन,

कंधार जि. नांदेड.

♦♦♦